**नवी मुंबई सायन्स फौण्डेशन**
[नोंदणी क्रमांक: महा /२५९२ / १० / (ठाणे)
[बॉम्बे सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक- F/२४०९३/ठाणे]
बी-५१, गीतांजली, भूखंड क्रमांक - ५२, सेक्टर – १७, वाशी,
नवी मुंबई – ४००७०३. (भ्रमण ध्वनी क्रमांक – ९३२४१ ६८५१०)
अध्यक्ष: डॉ. ए. एम. भागवत (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९३२४१ ६८५१०)
सचिव: डॉ. ए. के. राजराजन (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९९२०६ ४५९९०)
संयोजक: डॉ. जयंत जोशी (भ्रमण ध्वनी क्रमांक - ९८६९४ ६५११६९)

**श्री गुजराथी समाज**
न्यास नोंदणी क्रमांक: F/९६८ ठाणे (१९८३)
गुजराथ भवन, भूखंड क्रमांक - ६१ A/B सेक्टर-१५, वाशी,
नवी मुंबई -४००७०३
दूरध्वनी: २७८०० १३४, २७८००१३
मानद अध्यक्ष: श्री. हसमुखभाई कनानी
पूर्वाध्यक्ष: श्री. कौशिकभाई पटेल
सरचिटणीस: श्री. महेशभाई कथारीया

# विज्ञान उत्सव – २०२५

दि. : ०५ / ११ / २०२४.

**(पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय, नवीन पनवेल यांच्या सहयोगाने)**

**दोन दिवसीय शिक्षक परिषद (TC-२५) आणि विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन**

**महोदय / महोदया,**

नवी मुंबई सायन्स फौण्डेशन (NMSF) दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात **विज्ञान उत्सव** आयोजित करते. या शैक्षणिक वर्षाचा “ **विज्ञान उत्सव** ” ८ व ९ फेब्रुवारी, २०२५, ला होणार आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात **पहिल्या दिवशी शिक्षक परिषद (TC-**२५**) आणि दुसऱ्या दिवशी** विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन असेल.

या पूर्वी नवी मुंबई सायन्स फौण्डेशनला तुमच्या शाळेशी / कनिष्ठ महाविद्यालयाशी परस्पर संवादाचा फायदा झाला होता, आणि म्हणूनच, आम्हाला हे वैयक्तिक आमंत्रण तुम्हाला पाठवताना आनंद होत आहे. या दोन्ही कार्यक्रमासाठी तुमच्या शाळेतील / कनिष्ठ महविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी अशा दोघांच्याही उत्साही सहभागाची अपेक्षा आहे.

**शिक्षक परिषद-२०२५** ची मुख्य मध्यवर्ती कल्पना **"शालेय शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता"** अशी आहे आणि या संकल्पनेचे **टिपण** संदर्भासाठी जोडले आहे. तुमच्या शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित वरील संकल्पनेवर वैयक्तिकरित्या किंवा संयुक्तपणे एक किंवा अधिक शोधपत्र / निबंध सादर करावेत अशी विनंती आहे. परिषदे दरम्यान शिक्षकांना त्यांचे शोधपत्र सादर करण्याची संधी पण मिळेल. परिषदेची कार्यवाही / इतिवृत्त NMSF च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. सर्व स्वीकृत शोधपत्रांना **रोख रक्कम** प्रोत्साहन म्हणून मिळेल. **तसेच दुसऱ्या दिवशीच्या "विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनात"** इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना चांगल्या सहभागासाठी प्रोत्साहन दिले जाते.

"शिक्षक परिषदेसाठीचे शोधपत्र" पाठविण्याची अंतिम तारीख बुधवार, दि. १५ डिसेंबर, २०२४, आहे व "प्रयोगांवरील लेखन" पाठविण्यासाठी शनिवार, दि. १५ जानेवारी, २०२५, आहे. त्याबरोबर संकेतस्थळावर उपलब्ध असलेला संबंधित “गुगल नोंदणी फॉर्म” पण पाठवावा. शिक्षक परिषदेसाठीचे शोधपत्र व प्रयोगांवरील संपूर्ण शोधपत्र / लेखन "ई-मेल" द्वारे खालील ई-मेल पत्यावर पाठवले जाऊ शकता. nmsfscienceutsav@gmail.com **किंवा** jvjoshi२००२@yahoo.co.in

**संपर्कासाठी अन्य व्यक्ती**: **डॉ. ए. के. राजराजन** (ई-मेल **-** misraju@gmail.com, भ्रमण ध्वनी क्रमांक**: ९९२०६ ४५९९०**)
**डॉ. ए. एम्. भागवत** (ई-मेल - ambhagwat@gmail.com, भ्रमण ध्वनी क्रमांक: ९३२४१ ६८५१०)

## सहभागासाठी नाममात्र नोंदणी शुल्क निश्चित केले आहे.

१**) शिक्षक परिषदेसाठी: रु.५००/- प्रति सहभागी,** आणि २**) विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनासाठी: रु. २००/- दोन विद्यार्थ्यांच्या प्रति संघासाठी.**

कृपया “**दोन्ही गुगल नोंदणी फॉर्मसाठी” NMSF** च्या संकेत स्थळाला (www.navimumbaisciencefoundation.or) भेट द्या. सहभागासाठी इतर मार्गदर्शक तत्त्वे सोबत जोडली आहेत.

आम्ही तुमच्या शाळेच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा करतो.

हार्दिक शुभेच्छांसह,

आपला नम्र,

डॉ.जयंत जोशी, संयोजक, विज्ञान उत्सव-२०२५.

**जोडपत्र:** १. शिक्षक परिषद-२०२५ च्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित टिपण.
२. विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शनाच्या प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

**.......... पुढे चालू आहे.**

नवी मुंबई सायन्स फौण्डेशन
[नोंदणी क्रमांक: महा /२५९२ / १० / (ठाणे)
[बॉम्बे सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक- F/२४०९३/ठाणे]
बी-५१, गीतांजली, भूखंड क्रमांक - ५२, सेक्टर – १७, वाशी,
नवी मुंबई – ४००७०३. (भ्रमण ध्वनी क्रमांक – ९३२४१ ६८५१०)
अध्यक्ष: डॉ. ए. एम. भागवत (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९३२४१ ६८५१०)
सचिव: डॉ. ए. के. राजराजन (भ्रमण ध्वनी क्रमांक- ९९२०६ ४५९९०)
संयोजक: डॉ. जयंत जोशी (भ्रमण ध्वनी क्रमांक - ९८६९४ ६५१६९)

श्री गुजराथी समाज

न्यास नोंदणी क्रमांक: F/९६८ ठाणे (१९८३)
गुजराथ भवन, भूखंड क्रमांक - ६१ A/B सेक्टर-१५, वाशी,
नवी मुंबई -४००७०३
दूरध्वनी: २७८०० १३४, २७८००१३
मानद अध्यक्ष: श्री. हसमुखभाई कनानी
पूर्वाध्यक्ष: श्री. कौशिकभाई पटेल
सरचिटणीस: श्री. महेशभाई कथारीया

**शिक्षक परिषद-२०२५ साठी मध्यवर्ती कल्पना**

# "शालेय शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)"

## संकल्पनेचे टिपण

**परिवर्तनशील शिक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा लाभ घेणे व २१ व्या शतकात शिक्षक आणि विद्यार्थ्यांना सक्षम करणे.**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही शिक्षणासह अनेक उद्योग धंद्यामध्ये मध्ये परिवर्तन घडवीत आहे. जसजसे शिक्षक वाढत्या डिजिटल लँडस्केप मधून प्रवास करतात, तसतसे AI च्या अध्यापनाचे आणि शिकण्याचे परिणाम वाढविण्यासाठी AI समजून घेण्याची आणि त्याचा लाभ घेण्याची तातडीची गरज आहे. AI ची साधने (टूल्स) शिक्षकांना सूचना आत्मसात करण्यात, प्रशासकीय कार्ये सुव्यवस्थितपणे पार पाडण्यात आणि विद्यार्थ्यांना अनुकूल शिक्षण अनुभव प्रदान करण्यात मदत करतात. तथापि, शिक्षणात AI ची समरसता (एकत्रीकरण) वाढवताना नैतिक चिंता, डिजिटल विषमता (विभाजन) आणि व्यावसायिक विकास यासारखी आव्हाने देखील वाढतात.

## उद्दिष्टे:

या परिषदेचे उद्दिष्ट शिक्षक, शैक्षणिक नेते, संशोधक आणि धोरणकर्ते यांना एकत्र आणून “शिक्षणावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) प्रभाव शोधणे” असा आहे. **मुख्य उद्दिष्टांमध्ये हे पण समाविष्ट आहे:**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वैयक्तिक शिक्षणाला कसे समर्थन देऊ शकते आणि विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना कशी मदत करू शकते यावर चर्चा करणे.

२. वर्गातील दैनंदिन क्रियाकलापांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता-चालित साधने समाविष्ट करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियोजन, देखरेख आणि मूल्यमापन या सारखी कौशल्ये वाढतील आणि त्यांची गणना “स्वतंत्र आणि प्रभावी पणे शिकणाऱ्या (वाटचाल करणाऱ्या) विद्यार्थ्यां मध्ये” होईल.

३. शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरताना “संभाव्य आव्हाने” आणि “नैतिक विचार” या दोघांना ओळखणे.

४. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना शिक्षकांना होत असलेल्या व्यावसायिक विकासाची मदत प्रकाशात आणणे.

५. शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता वाढवण्यासाठी सहयोगी संशोधन आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन देणे.

## मध्यवर्ती कल्पना:

**ही परिषद, शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित बऱ्याच बाबी पडताळेल, परंतु त्या मुद्द्या पुरतीच मर्यादित राहणार नाही:**

1. **कृत्रिम बुद्धिमत्ता-संचालित वैयक्तिकृत शिक्षण आणि स्वतः च्या विचारसरणी-संबंधी जाणिव व समज यांचा विकास:** आत्म-प्रतिबिंब आणि ध्येय निश्चिती यांसारख्या धोरणांना प्रोत्साहन देताना **AI कशा प्रमाणे**, गती आणि गरजांनुसार, सूचना तयार करू शकते.
2. **शिक्षकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने:** AI च्या उपायांद्वारे धड्यांचे नियोजन, ग्रेडिंग (श्रेणी) आणि प्रशासकीय कार्ये सुलभ करणे.
3. **कृत्रिम बुद्धिमत्तेमधील शिक्षण व नितीमत्ता:** कृत्रिम बुद्धिमत्ताधारित गणितीय पायऱ्यांमधील गोपनीयता, माहितीची सुरक्षा आणि संभाव्य पूर्वाग्रह यांसारख्या समस्यांचे निराकरण करणे.
4. **अंकीय विभाजनामुळे निर्माण होणारे अंतर कमी करणे:** याकरिता सर्व विद्यार्थ्यांसाठी AI आधारित साधनांची आणि तंत्रज्ञानाची समान उपलब्धता सुनिश्चित करणे.
5. **कृत्रिम बुद्धिमत्ता आत्मसात करण्यासाठी व्यावसायिक विकास:** शिक्षकांच्या अध्यापनात AI समाविष्ट करण्यासाठी लागणारी आवश्यक कौशल्ये योग्य त्या व्यावसायिक धोरणातून साकार करणे.

**.......... पुढे चालू आहे.**

## अपेक्षित परिणाम:

1. **वाढलेली जागरूकता:** उपस्थितांना नवीनतम AI आधारित साधनां बद्दल आणि त्यांच्या शिक्षण वाढवण्याच्या संभाव्यतेबद्दल अंतर्दृष्टी मिळेल.
2. **कृती करण्यायोग्य रणनीती:** विद्यार्थ्यांची प्रतिबद्धता आणि परिणाम सुधारण्यासाठी शिक्षक AI चा आणि जाणिव-समज (metacognition) पद्धतींचा त्यांच्या वर्गात कसा समावेश करायचा ते शिकतील.
3. **सहयोगी जाळे:** सहभागीना समवयस्क, संशोधक आणि उद्योग तज्ञांशी संबंध निर्माण करता येतील. तसेच चालू असलेल्या सहयोगी जाळ्याचा शिक्षणामध्ये जाणिव-समज समाविष्ट करण्याच्या कार्याला प्रोत्साहन मिळेल.
4. **धोरण शिफारशी:** येथील चर्चेमधून शाळेत AI च्या सुरक्षित आणि प्रभावी पणे अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या मार्गदर्शक तत्त्वांची आणि धोरणांच्या विकासाची माहिती मिळेल. तसेच येथील चर्चेमधून शाळेत जाणिव-समज वाढण्यास समर्थन मिळेल.

## स्वरूप:

परिषदेतील मुख्य भाषण आणि निमंत्रित चर्चा (talks), AI क्षेत्रातील शिक्षण तज्ञांच्या असतील. उपस्थित शिक्षक परस्परसंवादी कार्यशाळा मध्ये भाग घेतील आणि शाळेत उपयुक्त ठरलेल्या AI केस स्टडीज वर उहापोह पण करतील. तसेच उपस्थितांना AI आधारित शैक्षणिक साधनांचा स्वहस्त-कृती सत्रांमध्ये अनुभव घेण्याची संधी पण मिळेल.

## लक्ष्यित प्रेक्षक:

- शिक्षक आणि एज्युकेटर्स
- शाळा प्रशासक आणि धोरणकर्ते
- शैक्षणिक तंत्रज्ञान विकासक
- शैक्षणिक तंत्रज्ञानातील संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ
- शिक्षक प्रशिक्षण संस्था

## निष्कर्ष:

शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांसाठी शैक्षणिक अनुभव कसा वाढू शकतो हे शोधण्यासाठी ही AI परिषद एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. शिक्षकांना ज्ञान आणि साधनांसह सक्षम करून, आम्ही हे सुनिश्चित करू शकतो की कृत्रिम बुद्धीमत्ता ही समानता, सर्जनशीलता / नवीनता आणि विद्यार्थ्यांच्या यशाला समर्थन देणाऱ्या मार्गांनां एकत्रित करते.

**शेवटी,** हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की ज्या शोधपत्रिकांना/निबंधांना “डेटा / आकडेवारी / फीडबॅक” यापैकी कोणत्याही एक किंवा अधिक मुद्द्यांचे समर्थन प्राप्त आहे, त्यांना प्राधान्य मिळेल.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

**.......... पुढे चालू आहे.**
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

# लेखकांसाठी मार्गदर्शक सूचना

संभाव्य लेखकांचे मुख्य मध्यवर्ती कल्पनेशी संबंधित कागदपत्रे पाठवण्यासाठी स्वागत आहे, जरी ते थेट उप-मध्यवर्ती कल्पनेशी संबंधित नसले तरीही.

**परिषदेची प्रक्रिया:** एकदिवसीय परिषदेमध्ये या विषयावरील तज्ज्ञांच्या काही निमंत्रित चर्चा आणि मुख्यतः **"सहभागी शिक्षकांच्या योगदानाची"** तोंडी आणि पोस्टर्स द्वारे सादरीकरणे असतात. ही परिषद शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री गुजरात भवन, सेक्ट-१५/१६, वाशी येथे होणार आहे. सविस्तर कार्यक्रम योग्य वेळी जाहीर केला जाईल.

**योगदान विचारार्थ पाठवा:** विषयाशी संबंधित आणि १००० शब्दांपेक्षा जास्त नसलेले निबंध / शोधपत्र आमंत्रित केले आहेत. हे इंग्रजी / हिंदी / मराठीत असू शकतात. हे शक्यतो **<nmsfscienceutsav@gmail.com>** वर ईमेलद्वारे जमा केले जाऊ शकतात. शोधपत्रामध्ये स्पष्ट शीर्षक, लेखकांची यादी, संलग्नता, गोषवारा, मजकूराचा मुख्य भाग आणि संदर्भ (असल्यास) असावेत. हे तज्ञ आणि समवयस्कांकडून नियंत्रित केले जातील. स्वीकृती आणि अभिप्राय लेखकांना कळवले जातील. संमेलनात लेखकांनी सादर केलेले स्वीकृत योगदान "परिषदेचे इतिवृत्त" म्हणून आणले जाईल आणि आंतरराष्ट्रीय संदर्भासाठी नवी मुंबई सायन्स फौण्डेशन (NMSF) च्या वेबसाइटवर उपलब्ध केले जातील.

**गुगल नोंदणी फॉर्मसह कागदपत्रे प्राप्त करण्याची अंतिम दिनांक (प्रत्येक सहभागीसाठी एक) १५, डिसेंबर, २०२४ आहे. प्रत्येक सहभागीने (एकाच शोधपत्राचे सह-लेखक असले तरीही) वैयक्तिकरित्या नोंदणी करणे आवश्यक आहे. इतर तपशीलांसाठी, कृपया परिपत्रक पहा.**

## शिक्षक संमेलनासाठी / विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनासाठी नोंदणी आवश्यक आहे

### नोंदणी शुल्क:

**१. शिक्षक संमेलनासाठी** प्रति सहभागी रु. ५००/-
**2. विज्ञान प्रयोगांच्या प्रदर्शनासाठी** रु. २००/- (प्रति संघ- २ विद्यार्थ्यांचा)

**नोंदणी शुल्क भरण्याची पद्धत –**

1. **ऑनलाइन धनादेश हस्तांतरणासाठी तपशील:**

   **बँकेचे नाव:** ठाणे जनता सहकारी बँक लि.
   **पत्ता:** वाशी शाखा, प्लॉट क्रमांक ५१, से. १७, वाशी, नवी मुंबई – ४००७०३.
   **खाते धारकाचे नाव:** नवी मुंबई सायन्स फाउंडेशन.
   **बचत खाते क्रमांक:** ०१२११०१००००२५८५. IFSC संकेत: TJSB००००००१२.

2. **चेकने पेमेंट करण्यासाठी खाते धारकाचे नाव:** "नवी मुंबई सायन्स फाउंडेशन".

**NMSF चे संकेत स्थळ:** http://www.navimumbaisciencefoundation.org

**...... पुढे चालू आहे.**

# <u>विज्ञान उत्सव-२०२५</u>

**विज्ञान प्रयोगांचे सहभागी प्रदर्शन (एकट्या प्रारूपाला परावृत्त केले जाते)**

**विद्यार्थी आणि शिक्षक-मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे**

(**दाखल होण्याची वेळ:** रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०८. ३० वाजता, श्री गुजरात समाज, सेक्टर १५, वाशी)

**परिचय:** शालेय अभ्यासा दरम्यान आलेल्या कोणत्याही वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित कोणताही प्रात्यक्षिक प्रयोग प्रदर्शित करून विद्यार्थी त्यांची सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्णता येथे प्रदर्शित करू शकतात. प्रयोगामध्ये प्रमाणीकरण, स्पष्टीकरण, वैज्ञानिक तत्त्वाचा वापर आणि/किंवा त्याची मर्यादा प्रदर्शित करणे आवश्यक आहे. प्रात्यक्षिकाच्या साधेपणावर भर द्यायला हवा, जेणेकरुन घरगुती वस्तू वापरून सुद्धा ते घरी सुरक्षितपणे केले जाऊ शकतात.

## <u>योजनेचे नियम खालीलप्रमाणे आहेत.</u>

१.प्रत्येक प्रयोगात सहभागींची संख्या दोनपेक्षा जास्त नसावी आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाची भूमिका सादरीकरणात स्पष्ट आणि पुरेशी असावी.

२. एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन प्रयोगांचा भाग असू शकतो.

३. इयत्ता ७ वी ते ९वीचे विद्यार्थी या प्रदर्शनातमध्ये भाग घेण्यास पात्र आहेत. ते भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा गणितातील कोणताही विषय निवडू शकतात. **साधारणपणे प्रति शाळेतील ५ संघांना परवानगी आहे.** जागा उपलब्धतेच्या अधीन राहून आणि पूर्वपरवानगी घेऊन शाळा अधिक प्रयोग सादर करू शकते.

३A . प्रत्येक शाळा आपल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी सोबत शिक्षक पाठवेल.

४. सहभागीं नी प्रयोगावर लेखन जमा करणे आवश्यक आहे (२०० शब्दांपेक्षा जास्त नाही). लेखनात एकसारखी रचना असावी म्हणजेच अ) ध्येय, / गृहीतक, ब) उपकरण, क) प्रायोगिक सेटअपचे बांधकाम, ड) मोजमापाची पद्धत, इ) डेटा संकलन, ई) चर्चा, उ) अनुमान / निष्कर्ष.

**५. <u>प्रयोगांची सांगड:</u> प्रयोग, विज्ञानाच्या कोणत्या वर्गाच्या पाठ्यपुस्तकाच्या कोणत्या धड्याशी संलग्न आहे (अभ्यासक्रमासह, म्हणजे CBSE/ICSE/CIE इ.) हे दाखविणाऱ्या प्रयोगांना सर्वोच्च प्राधान्य मिळेल.**

**६. गुगल नोंदणी फॉर्मसह तुमचे लेखन पाठवा: नोंदणी शुल्क: रु. २००/- प्रति संघ/प्रयोग.**

### लेखन आणि नोंदणी सबमिट करण्याची शेवटची तारीख शनि १५ जानेवारी २०२५, आहे.

७. तज्ञांच्या टीमने निवडलेल्या नोंदी केवळ प्रदर्शनात सहभागी होतील.

८. प्रयोग सुरक्षित आणि सहज पोर्टेबल असावा. त्याच्या प्रदर्शनासाठी फक्त <u>एक टेबल-टॉप जागा (४ फूट बाय २ फूट)</u> दिली जाईल. प्रयोगासाठी लागणारी सर्व “उपकरणे/साहित्य” सहभागीं नी आणली पाहिजेत. कोणताही वीज पुरवठा केला जाणार नाही. विद्युत उर्जेची आवश्यकता असलेले प्रयोग केवळ जास्तीत जास्त १२-व्होल्ट वीज पुरवठ्यावर आधारित असतील, याची काळजी घेणे. याची व्यवस्था पण प्रयोगकर्त्यांनी स्वतःच करायची आहे.

९. **परिक्षकांनी निवडलेल्या प्रदर्शनांना रोख बक्षिसे मिळतील. सर्व सहभागींना सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाईल.**

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~